# GOVERNMENT LAW COLLEGE

## INTERNAL QUALITY ASSURANCE CELL MEETING

DATE : 30/09/2021

AT ROOM NO : 14 (Professor Room)

TIME : 1.00 PM

Co-ordinator
Dr. S. A. Panchbhai
Asst. Professor

Director
Dr. A. A. Vaidya
Principal

Tel. : 022-2204 1707
Fax : 022-2204 1708

सत्यमेव जयते

Government of Maharashtra
महाराष्ट्र शासन

NE VILE FANO
Estd. 1855

# Government Law College
शासकीय विधी महाविद्यालय

'A' ROAD, CHURCHGATE, MUMBAI 400 020. 'ए' रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.
• Website : www.glcmumbai.com • E-mail : principal@glcmumbai.com

Ref. No. / क्रमांक GLC/D/2021/1176

Date / दिनांक : 28/9/2021

To,
Honble Dr. Ashok Yende
Expert Member (Education) IQAC,
GLC, Mumbai Flat No. 1701,
A wing, Altavista Alpptt. Praviate Lal dongar,
Chembur East Near Suvrna sethia hospital,
Sion –Trombe Road, Mumbai.

**Sub: Statutory quarterly meeting of IQAC in GLC.**

Respected Sir,

The Statutory quarterly Meeting of IQAC will be held on 30th September 2021. The Said meeting will be conducted at GLC's Staff Room meeting Hall at 1.00p.m. you are cordially invited for the meeting.

AGENDA OF THE MEETING

1. Academic Development of Law College
2. NAAC work Progress report.
3. Any other topic with the permission of the chair.

Yours faithfully

AAVaidya 28/09/21

PRINCIPAL

PRINCIPAL
Government Law College
'A' Road, Churchgate, Mumbai - 20

③

# GOVERNMENT LAW COLLEGE
## MEETING OF IQAC
## ATTENDANCE SHEET

Date :- 30/09/2021

Time- 1:00 p.m.

| Sr. No. | Name of the Member / Invitee | Signature |
|---|---|---|
| 1 | Dr. Asmita Vaidya, Principal & Chairman | A.Vaidya 30/09/21 |
| 2 | Dr. S. Panchbhai, Asstt. Prof & Member Secretary | [signature] 30/09/21 |
| 3 | Shri. Adv. Sagar Rane, | S.Rane 30/9/21 |
| 4 | Shri. Pandurang Daphal, | Daphal PB 30/09/2021 |
| 5 | Smt. Kavita ~~Headoo~~, Hedaoo. | K.Hedaoo 30/9/21. |
| 6 | Dr. Umesh Aswar, | [signature] 30/9/21 |
| 7 | Smt. Anita Desale | Desale 30/9/21 |
| 8 | Smt. M.V. Deshpande | [signature] 30/9/21 |
| 9 | | |
| 10 | | |
| 11 | | |
| 12 | | |
| 13 | | |
| 14 | | |
| 15 | | |

# शासकीय विधी महाविद्यालय

'ए' रोड,चर्चगेट, मुंबई-400 020.

**IQAC सभा क्र. १ दि. ३०/०९/२०२१**

या महाविद्यालयाच्या दि. २९/०९/२०२१ च्या पत्रानुसार दि. ३०/०९/२०२१ रोजी महाविद्यालयाच्या मिटिंग हॉल (स्टाफ रुम) मध्ये Internal Quality Assurance Cell (IQAC) ची सभा संपन्न झाली. समन्वयक डॉ. पंचभाई हयांनी सगळयांचे स्वागत केले सभेसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य, समन्वयक (IQAC)सदस्यांव्यतरिक्त अॅड. सागर राणे, माजी विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते. महाविद्यालया बाहेरील तज्ज्ञ व्यक्ती वेळेवर सभा ठरल्यामुळे उपस्थित राहू शकले नाही असे निदर्शनास आले. त्यामुळे पुढील सभेची तारीख ही मुख्यत्वे अॅड. रफीक दादा हयांना त्यांच्या कार्यव्यस्ततेमुळे सोईचे होईल अशी ठरवावी व १०-१२ दिवस आधी पत्र पाठवावे असे ठरले. तसेच पत्रावर समन्वयंकाचीही स्वाक्षरी असावी असे प्राचार्यानी सुचित केले. तसेच पुढील सभा शक्यतो Online पध्दतीने घेण्याचे ठरले. हया आधी निवड झालेल्या पत्रात काही स्पेलिंग चुका असल्यामुळे सदर पत्र परत पाठविण्याचे ठरले.

हयानंतर मा. प्राचार्य डॉ. अस्मिता वैद्य हयांनी IQAC म्हणजे काय? त्याचे काय काम असते हे विस्तृत पणे सांगितले त्या म्हणाल्या "IQAC has a supervisor work in college. They hav to look after in teaching plan research work, API of Prof. Etc. IQAC co-ordinator plays very important role."

त्यानंतर त्यांनी ४ बाहेरील तज्ज्ञ व्यक्ती का घेतल्या जातात हयांबद्दलही माहिती दिली.

**सभेचा पहिला विषय:** Academic Development of Law College, या विषयात मा. प्राचार्यांनी सांगितले की,

१(A) महाविद्यालयाने भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पुर्ण झाल्यामुळे Azadi ७५ या बॅनर खाली एकूण ७५ कार्यक्रम घेण्याचे ठरले. त्यात...........

१. Lecture Series
२. National level webinar
३. International level seminar
४. DLLE-NSS अंतर्गत Law awareness programme.
५. Quiz etc. कार्यक्रम घेण्याचे ठरले व २ National level चे webinar झाल्याचे सांगितले.

B. महाविद्यालयातील शैक्षणिक सत्र २०२१-२२ पासून ५ वर्षीय व ३ वर्षीय विधी अभ्यासक्रमासाठी नाममात्र रु. २००/- इतके शुल्क घेऊन ५ Add on certificate course ३ महिन्याच्या कालावधीसाठी सुरु करण्याचे ठरविले आहे. तसे विद्यार्थ्यांना सुचित करण्यात आले आहे. सदर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

१. Certificate Course in Communication Skill for (New Entrant)
२. Certificate Course in Digi Law
३. Certificate Course on Alternate Dispute resolution
४. Certificate Course on Trail Education
५. Certificate Course on Advocacy Skils

वरिल सर्व कोर्सची माहिती व महत्त्व थोडक्यात विषद करण्यात आले.

तसेच महाविद्यालय LL.M. सुरु करण्यासाठी प्रयत्नरत असल्याबाबत कळविले.

Add on Coursee सुरु केल्याबद्दल ॲड सागर राणे, माजी विद्यार्थी प्रतिनिधी हयांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले. तसेच त्यांनी असेही सुचविले की मराठी माध्यमातून जे विद्यार्थी येतात ते भिडस्त असतात. त्याच्यातही खूप गुण असतात परंतु भिडस्त स्वभावामुळे ते समोर येत नाही त्यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळेल हयाबाबत प्राध्यापकांनी लक्ष द्यावे. मूट कोर्ट मराठी अभिरुप स्पर्धा घ्यावी.

**विषय क्र. २- NAAC Progress**

महाविद्यालयाला नियमित प्राचार्यांची नियुक्ती झाल्यामुळे महाविद्यालयाने नॅक करण्याचा निर्णय झालेला आहे. नॅक समन्वयक म्हणून डॉ. पंचभाई, सहाय्यक प्राध्यापक हे काम पहात आहे. त्यांनी सदर विषयाबाबत सभेला सांगितले की महाविद्यालयाचे नॅक करण्यासाठी मॅन्यूल नुसार ७ निकष (Criteria) आहेत. त्यावर सर्व प्राध्यापकांची सर्वकष चर्चा होऊन सभेच्या दिनांकापर्यंत २ निकषांची Scrutiny झालेली आहे. संपुर्ण शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी नॅक चे काम करीत आहेत. हयासाठी २०१५-१६ पासूनची माहिती घेण्याचे ठरले आहे.

**विषय क्र.३ Any other subject with the permission of chair.**

हयाबाबत खालील विषयांवर सर्वकष चर्चा झाली.

**१. महाविद्यालयाचे Vision Misson**. महाविद्यालयाच्या वेबसाईट वर महाविद्यालयाचे Vision Misson टाकावे हयासाठी सर्व प्राध्यापकांनी हयाबाबत आपले विचार लेखी स्वरुपात सादर करावे. म्हणजे त्यातील नवनीत घेऊन मुख्य Vision व मिशन तयार करता येईल.

२. **महाविद्यालयाच्या Logo** बद्दल काही विद्यार्थ्यांनी मा. प्राचार्यांशी चर्चा केलेली असल्यामुळे हयाबाबत विद्यार्थ्यांकडून सुचना स्वीकाराव्या व नंतर Logo मध्ये बदल करावा किंवा कसे हयाबाबत सर्वानुमतेठराव करावा असे ठरले.

३. **Auditorium Entrance** ला विधी विषयात नावालेल्या व्यक्तींचे फोटो लावणे. महाविद्यालयाच्या सभागृहात प्रवेश करतानाच्या व्हरंडयाच्या भिंतीवर विधी विषयात नावजलेल्या तसेच महाविद्यालयात शिकविलेल्या व नावाजलेल्या (जसे की, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ.) व्यक्तीच जीवनाचा थोडक्यात परिचय फोटोसह प्रिंट करण्याचे ठरले.

**४. Azadi-७५ ची सांगता**

महाविद्यालयाच्या Azadi-७५ या कार्यक्रमाची सांगता दि. २६ जानेवारी २०२२ ला करणार असल्याचे प्राचार्यांनी सांगितले सदर कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त प्राध्यापकांना निमंत्रण द्यावे असे ठरले.

**५.महाविद्यालयाच्या कमिटीबाबत**

महाविद्यालयात अनेक समित्या आहेत. त्यातील काही समित्यांचे (जसे की NSS, Moot Court) स्वःताचे खाते बँकेत आहेत. अशा सर्व समित्यांचे खाते बंद करुन ते खाते त्या त्या समितीच्या समन्वयक व प्राचार्यांच्या नावाने उघडुन मगच व्यवहार होतील.

**६.दीर्घ मुदतीच्या सुट्टीमध्ये Internship करणेबाबत.**

विद्यार्थ्यांना ऊन्हाळी सुट्टी मध्ये त्यांच्या गावाला किंवा मुंबईत (विद्यार्थ्यांच्या सोयी व इच्छेनुसार) Internship विविध ठिकाणी करणे व त्यासाठी ४० मार्क्स मध्ये अंतर्गत गुण देणे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष काम कसे असते हयाचा परिचय होईल.

**७. Court Visit**

विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये Court Visit ज्या वर्षाला जो प्रात्यक्षिकाचा विषय असेल त्यानुसार वेळापत्रक करुन देणे. तसेच Court Visit Committee प्रथम प्राधान्याने स्थापन करणे त्यात पंजवाणी सर, डॉ. अस्वार सर, कविता हेडाऊ मॅडम व राणे सर हयांना घ्यावे असे ठरले.

पुढील सभेची तारीख २४ डिसेंबर, ११ डिसेंबर, किंवा १८ डिसेंबर समितीतील अभ्यागत विशेष तज्ज्ञांच्या (४ बाहेरील व्यक्ती) सोयीनुसार घेण्याचे ठरले.

सगळयांत शेवटी डॉ. अस्वार हयांनी सगळयांचे आभार मानले.

A.Vaidya

प्राचार्य